**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमध्ये वहिती खातेधारक शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः शेअवि-२०१८/प्र.क्र. १९३/११-अे,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: ३१ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा :</u>- १) कृषि व पदूम विभाग, शासन निर्णय क्र. एनएआयएस १२०४/प्र.क्र.१६६/११-अे, दि.१९.०८.२००४

२) कृषि व पदूम विभाग, शासन निर्णय क्र. शेअवि २००७/प्र.क्र.२३२/११-अे, दि.१३.०७.२००७

३) कृषि व पदूम विभाग, शासन निर्णय क्र. शेअवि २००९/प्र.क्र.२६८/११-अे, दि.०४.१२.२००९

४) कृषि व पदूम विभाग, शासन निर्णय क्र. शेअवि २०१० /प्र.क्र.१७२/११-अे, दि.१०.०८.२०१०

५) कृषि व पदूम विभाग, शासन निर्णय क्र. शेअवि-२०१५/प्र.क्र.१५९/११-अे, दि.२६.११.२०१५

६) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.शेअवि- २०१८/ प्र.क्र.१९३/११-अे, दि. ०१.१२.२०१८

<u>प्रस्तावना :-</u>

शेती व्यवसाय करतांना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे, इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात, तसेच, अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात, यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढावतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यास रु.२.०० लाख इतक्या रकमेचे विमा संरक्षण देण्यात येते. सदर प्रयोजनार्थ राज्यातील कृषि गणनेच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, सुमारे १.३७ कोटी वहितीधारक खातेदार शेतकऱ्यांपैकी १० ते ७५ वयोगटातील शेतकऱ्यांच्या वतीने संपूर्ण विमा हप्ता दरवर्षी राज्य शासनामार्फत विमा कंपनीला प्रदान केला जातो. सदर योजना सन २०१८-१९ या वर्षात दि.०८.१२.२०१८ ते दि.०७.१२.२०१९ या कालावधीत राबविण्यासाठी दि.०१.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

प्रचलित गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत शेतकऱ्याचे कुटुंब विमाछत्राखाली येत नसल्यामुळे त्याच्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तिचा अपघाताने मृत्यु झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास सदर व्यक्तींसाठी विमा संरक्षण अनुज्ञेय नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना अपघात झल्यास त्याला कोणताही आर्थिक लाभ दिला जात नाही. त्यामुळे अशा प्रकारे अपघात झाल्यास शेतकरी व त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक लाभ देय करावा अशा प्रकारची मागणी शेतकरी व लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी केली आहे. तसेच मा.मंत्री (वित्त) यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केलेल्या घोषणेस अनुसरुन शेतकरी अपघात विमा योजनेमध्ये बदल करुन सदर योजनेंतर्गत नव्याने प्रसिध्द झालेल्या कृषि गणना सन २०१५-१६ प्रमाणे निर्धारित केलेल्या सुमारे १.५२ कोटी वहितीधारक खातेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणत्याही १ सदस्यांचा देखील सदरच्या विमा योजनेअंतर्गत समावेश करुन एकुण सुमारे ३.०४ कोटी जणांना सदर योजनेंतर्गत विमाछत्र देवून सदरची प्रचलित योजना अधीक व्यापक व सर्वसमावेशक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेबाबतचे यापुर्वीचे शासन निर्णय अधिक्रमित करून सुधारित स्वरूपाची योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

शेती व्यवसाय करतांना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे, इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात, तसेच, अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात, यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढावतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणताही १ सदस्य (आई-वडील, शेतकऱ्याची पती/पत्नी, मुलगा व अविवाहीत मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वर्ष वयोगटातील एकुण २ जणांकरीता गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या प्रयोजनार्थ कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले १ सदस्यांमध्ये आई-वडील, शेतकऱ्याची पती/पत्नी, मुलगा व अविवाहीत मुलगी यांचा समावेश ग्राह्य धरण्यात येईल.

३. कृषि गणना सन २०१५-१६ प्रमाणे निर्धारित केलेल्या सुमारे १.५२ कोटी वहितीधारक खातेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणताही १ सदस्य असे एकुण २ जणांकरीता गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत खालील लाभ अनुज्ञेय असतील.

I. अपघाती मृत्यु झाल्यास रु.२.०० लाख, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय तसेच एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास रु.२.०० लाख इतकी नुकसान भरपाई अनुज्ञेय राहील.

II. अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास रु.१.०० लाख नुकसान भरपाई अनुज्ञेय राहील.

४. सदर योजना कालावधीत संपूर्ण दिवसासाठी म्हणजेच विहित कालावधीतील प्रत्येक दिवसांच्या २४ तासांसाठी ही योजना लागू राहील. या कालावधीत वहितीधारक खातेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणताही १ सदस्य यापैकी कोणत्याही व्यक्तिला केंव्हाही अपघात झाला किंवा अपंगत्व आले तरीही ते या योजनेंतर्गत लाभासाठी पात्र राहतील.

५. या योजनेंतर्गत शेतकरी / त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तिने किंवा त्यांच्या वतीने अन्य कोणत्याही संस्थेने विमा कंपनीकडे स्वतंत्ररीत्या विमा हप्ता भरण्याची गरज नाही. विमा हफ्त्याची संपूर्ण रक्कम शासनामार्फत विमा कंपनीकडे भरण्यात येईल. तसेच यापुर्वी शेतकरी / त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तिने अथवा त्यांच्या वतीने अन्य कोणत्याही संस्थेने कोणतीही विमा योजना लागू केली असल्यास अथवा विमा उतरविला असल्यास त्याचा या योजनेशी काहीही संबंध असणार नाही. या योजनेंतर्गत मिळणारे लाभ स्वतंत्र असतील.

६. तथापि, सदर योजनेंतर्गत लाभास पात्र असणाऱ्या शेतकऱ्याने / शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने अथवा वारसदाराने शासनाच्या अन्य विभागांकडून अपघातग्रस्तांसाठी कार्यान्वित असलेल्या योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभार्थी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत लाभास पात्र ठरणार नाहीत.

७. शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजनांची प्रभाविपणे अंमलबजावणी होण्यासाठी सर्व वहितीधारक शेतकऱ्यांची व त्यांच्या कुटुंबियातील सदस्यांची नोंदणी करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या सल्ल्याने पोर्टल कार्यन्वित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

८. प्रस्तुत सुधारीत योजनेसाठी महसूल विभागनिहाय विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीची निवड ई-निविदेव्दारे सुरुवातीस १ वर्षासाठी निवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तदनंतर योजनेचा लाभार्थी आकडेवारी, निश्चित होणारे Claims व Payout ratio याआधारे आढावा घेऊन प्रत्येक २ वर्षांसाठी ई-निविदेव्दारे विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीची निवड करण्यास मान्यता देण्यात येईल.

९. निविदा प्रक्रियेमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनी व इतर कंपनी यांनी नमूद केलेल्या दरामध्ये (Rate in Tender ) ५% पेक्षा कमी फरक असल्यास सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनीला किमान प्राप्त दराच्या (L१) ५ % दरापर्यंत प्राधान्य देण्यात येईल व त्यांना इतर कंपनींने नमूद केलेल्या किमान दरानुसार (L१) म्हणून काम करण्याची विचारणा करण्यात

येईल व यास त्यांनी सहमती दर्शविल्यास सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीची निवड करण्यात येईल.

१०. विमा कंपनीकडून claim settlement करताना शेतकऱ्याच्या/ वारसदाराच्या बँक खात्यात ECS व्दारे निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

११. सदर योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयुक्त, कृषि यांची राहील. तसेच योजनेच्या अंमलबजावणीबाबत सर्व सबंधित सहभागीदारांच्या प्रतिनिधी समवेत प्रत्येक ३ महिन्यास आढावा घेऊन त्याबाबचा प्रगती अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

१२. प्रस्तुत योजनेबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना व अवलंबवायची कार्यपध्दती स्वतंत्रपणे विहित करण्यात येईल.

१३. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता आयुक्त (कृषि) यांना पर्यवेक्षक व संनियत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१४. या योजनेकरीता येणारा खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत भागविण्यात येईल.

**मागणी क्र.डी-३,**
**२४०१- पीक संवर्धन**
**११०- पीक विमा**
(००) (०६) **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना (कार्यक्रम)** (२४०१ ४४२७)
**३३ - अर्थसहाय्य**

१५. प्रस्तुत शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे क्र. १३८/१४३१, दि. २७.०८.२०१९ व क्र. २१२/२०१९/व्यय-१, दि. २९.८.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१६. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०१९०८३११४४९१४८१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Neeta Eknath Shinde

Digitally signed by Neeta Eknath Shinde
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f2bffd6992498e56663024368c72b33364cfb066d53682c53a425e54d187a7c1, serialNumber=f325d659f47933958aa2d98f394db95f94be57548776492ba36e77ea1c4aa53b, cn=Neeta Eknath Shinde
Date: 2019.08.31 14:56:57 +05'30'

( निता शिंदे )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव

२) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
४) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
५) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
६) मा.राज्यमंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
७) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
८) सर्व मा.विधानसभा सदस्य
९) सर्व मा. विधानपरिषद सदस्य
१०) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई ३२
११) सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुमविभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१२) अपर मुख्य सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१३) अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४) अप्पर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५) अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१७) प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृहविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१८) महासंचालक, माहिती व ज नसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती ) प्रसिध्दीच्या विनंतीसह
१९) सर्व विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
२०) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१) सर्व जिल्हाधिकारी
२२) सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२४) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२५) सर्व जिल्हा परिषदांचे, जिल्हा कृषि विकास अधिकारी
२६) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा ), मुंबई.
२७) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, ( लेखावअनुज्ञेयता ), मुंबई
२८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा ), नागपूर
२९) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखावअनुज्ञेयता),नागपूर
३०) संचालक, लेखावकोषागारे, मुंबई
३१) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
३२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
३३) ग्रंथालय प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
३४) मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-
३५) सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३६) सर्व तहसिलदार
३७) सर्व उप विभागीय कृषि अधिकारी

३८) सर्व तालुका कृषि अधिकारी

३९) सर्व उपसचिव /अवरसचिव / कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

४०) सर्व मंत्रालयीन विभाग

४१) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांची मध्यवर्ती कार्यालये

४२) निवडनस्ती, कार्यासन ११-अे.